प्रेसनोट दि. २१/०५/२०१८

# फिर्यादी यांचे इन्स्टाग्राम, स्नॅप चॅट, फेसबुक अकाउंट हॅक करुन त्यांच्या मित्र-मैत्रिणीकडुन पैशांची मागणी करणा-या आरोपीस सायबर क्राईम सेल, पुणे शहर यांनी ताब्यात घेतले

पुणे शहरातील पिंपळे सौदागर या भागात राहाणा-या महीला तक्रारदार यांनी सायबर क्राईम सेल,पुणे शहर यांचेकडे त्यांच्या नावाचे इन्स्टाग्रामवर जे अकाउट आहे ते हॅक करुन त्यावर अश्लील व बदनामीकारक मजकूर पोस्ट करुन ते डीलीट करण्यासाठी रुपये १५,०००/- दया नाहीतर अकाउट डिलीट न करता त्यावर अशाच प्रकारे आणखी तयार केलेले फोटो पोस्ट करेल अशा धमकीचा अर्ज प्राप्त झाला होता. अधिक चौकशीअंती गैरअर्जदार कृष्णा बळीराम फड रा- जगदीश खानावळकर चाळ, रुम नं-२, खानावळकर आळी, नावडे, हनुमानमंदीर जवळ, पनवेल (कळंबोळी) जिल्हा- रायगड. मो.क्र. ९५११७५६९३८/७०३९९३९३०० याने सदरचा प्रकार केल्याचे निष्पन्न झाले त्यास ताब्यात घेवून अधिक चौकशी केली असता त्याने त्याच्याच ओळखीच्या ग्रुपमधील इतर आणखी सहा मुलींना अशाच प्रकारे त्यांचे अकाउट हॅक करुन त्यांचीही बदनामी करुन पैशाची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्या सहा मूलींपैकी दोन मूलींचे अर्ज सायबर क्राईमसेल कडे प्राप्त झाले होते. अर्जातील तक्रारीची दखल घेवून वर नमूद आरोपीस त्याने तक्रारदार मुलींची इन्स्टाग्राम, स्नॅपचॅट, फेसबुक अकाउट इत्यादी हॅक करण्यासाठी वापरलेल्या मोबाईल सह ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याविरुध्द गुन्हा दाखल करुन पुढील कारवाई करणेकामी त्यास सांगवी पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आले आहे.तसेच तक्रारदार मुलींना संबांधीत पोलीस स्टेशन ला जावून त्याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

अशाच प्रकारच्या तक्रारीचा आढावा घेता सन २०१७ साली पुणे शहर सायबर क्राईम सेल कडे एकूण ६०६ तक्रारी अर्ज प्राप्त झाले होते त्यापैकी २१४ अर्ज चौकशीअंती आरोपीची माहिती घेवून पुणे शहरातील संबांधीत पोलीस स्टेशन कडे वर्ग करण्यात आले आहे. तर सन २०१८ साली आतापर्यंत अशाचप्रकारचे एकूण १८९ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ६२ अर्ज गैरअर्जदार यांच्याविषयी माहिती घेवून पोलीस ठाणेकडे वर्ग करण्यात आले आहेत. अशाप्रकारे ज्या - ज्या मुली/महिलांना बदनामीकारक मजकूर पोस्ट करुन त्याबदल्यात पैशाची मागणी करण्यात आली असेल, अशा तक्रारदारांनी सायबर क्राईम सेल पूणे शहर येथे संपर्क साधावा.

सदरची कामगिरी ही पोउपनि रुपाली पवार, पोउपनि मंदा नेवसे, कर्मचारी मपोशि उमा पालवे, मपोशि ज्योती दिवाणे, पो.शि. शाहरुख शेख, पोशि योगेश वाव्हळ या पथकाने केली आहे.